आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

मंगळवार दिनांक १० डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

- देशात गरिबी आणि भूक निर्मूलन तसंच तरुणांना समान संधी देण्याची धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ दिला असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन.
- राज्य विधानसभा निवडणुकीच्या वेळी व्हिव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं पालन केलं असल्याचं निवडणूक आयोगाचं स्पष्टीकरण.
- ७व्या स्मार्ट इंडिया हॅकाथॉनचे उद्या केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते उद्घाटन होणार; नागपूरच्या जी.एच.रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा देशभरातील ५१ केंद्रात समावेश.
- 'ॲडव्हांटेज विदर्भ'च्या माध्यमातून विदर्भाच्या शाश्वत विकासाचे उद्दीष्ट पूर्ण करावे- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं आवाहन.

मानवाधिकार दिन

देशात गरिबी आणि भूक निर्मूलन तसंच तरुणांना समान संधी देण्याबाबतीतली धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ दिला आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. आंतरराष्टीय मानवाधिकार दिवसानिमित्त नवी दिल्लीत विज्ञान भवन इथे आयोजित कार्यक्रमात त्या आज बोलत होत्या, देशात मानवाधिकारांची योग्य अंमलबजावणी व्हावी, यासाठी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचं त्या म्हणाल्या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत १९४८ मध्ये मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्याच्या घटनेनिमित्त दर वर्षी दहा डिसेंबरला हा दिन साजरा करण्यात येतो. 'आपले हक्क, आपलं भविष्य, या क्षणी' असं यंदाच्या मानवी हक्क दिनाचं ब्रीदवाक्य आहे. दरम्यान, मानवी हक्क उल्लंघनाची सुमारे २३ लाख प्रकरणं राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या स्थापनेपासून नोंदवण्यात आली असून अशा प्रकरणांमधल्या पीडितांसाठी सुमारे २५६ कोटी रुपयांच्या निधीची शिफारस करण्यात आली आहे, असं आयोगानं प्रसिद्ध केलं आहे.

मानवाधिकार / राज्यपाल

राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनाच्या कार्यक्रमाचं राजभवन इथल्या दरबार हॉलमध्ये आज आयोजन करण्यात आलं. यावेळी निवृत्त न्यायाधीश एन.एच पाटील, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष के.के. तातेड, सचिव नितीन पाटील, सदस्य एम.ए सईद, संजय कुमार, मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, पद्मश्री शंकरबाबा पापळकर आदी

विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या २०२४ सोव्हिनिअरचं प्रकाशन करण्यात आलं.

संसद

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ होऊन आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांच्या वागणुकीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. सभागृहाच्या सभ्यतेचं पालन केलं जावं, तसंच देशातल्या जनतेच्या आशाआकांक्षांचा आदर राखत काम केलं जावं, असं आवाहन त्यांनी विरोधी नेत्यांना केलं. राज्यसभेत आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंग यांनी दिल्लीतल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित केला. यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी झाल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज तहकूब केल्याचं जाहीर केलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी चर्चा आणि वादविवाद यांच्या माध्यमातून संसदेचं कामकाज चालवण्याचं आवाहन संसद सदस्यांना केलं आहे. त्यापूर्वी आज सकाळी संसद भवन परिसरात विरोधी पक्षाच्या नेत्यांनी देशातल्या प्रमुख उद्योगसमूहानं केलेल्या तथाकथित लाचखोरीच्या मुद्द्यावरून निदर्शनं केली.

व्हीव्ही पॅट

प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही पाच मतदान केंद्रावरच्या व्ही व्ही पॅट चिठ्ठ्या मोजणं आवश्यक आहे. यानुसार २३ नोव्हेंबर रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीवेळी प्रत्येक मदारसंघातल्या प्रत्येकी पाच मतदान केंद्रावरच्या व्हीव्ही पॅट चिठ्ठ्या मोजण्यात आल्या होत्या, असं निवडणूक आयोगाने जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. त्यावेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते असंही यात म्हटलं आहे. या मोजणीनुसार २८८ मतदारसंघातल्या १ हजार ४४० व्ही व्ही पॅट युनिटची मोजणी करून ते संबंधित कंट्रोल युनिट डाटाशी जुळवून पाहण्यात आलं. दोन्हींची मोजणी केली असता आकड्यात कुठलीही तफावत आढळून आली नाही. त्यामुळे निवडणूक आयोगानं मतमोजणीवेळी सर्व प्रक्रियेचं पालन केलं आहे, असं पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

रिझर्व्ह बँक

रिझर्व्ह बँक ही एक समृद्ध परंपरा असलेली एक महान संस्था आहे, असं प्रतिपादन मावळते गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज केलं. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. सहा वर्षांच्या कालावधीत केलेल्या कामगिरीचं श्रेय आपण या संस्थेला आणि सहकाऱ्यांना देत असल्याचं दास यांनी सांगितलं. रिझर्व्ह बँकेचा

गव्हर्नर बनण्याची संधी आपल्याला मिळणं हे आपलं भाग्य असून भारतीय अर्थव्यवस्थेला फायदेशीर ठरतील असे निर्णय आपण घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तरीही अनेक समस्या आजही या संस्थेसमोर आहेत, असंही ते म्हणाले. शक्तिकांत दास आज रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर म्हणून निवृत्त होत असून त्यांच्या जागी संजय मल्होत्रा यांची गव्हर्नर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

एस. एम. कृष्णा निधन

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम.कृष्णा यांचं आज दीर्घ आजाराने निधन झालं. ते **92** वर्षांचे होते. एस.एम.कृष्णा यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री, केंद्रीय परराष्ट्र मंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल अशी विविध **10** पदे भूषविली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह इतर नेत्यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एस.एम.कृष्णा यांच्या निधनाने विकासाची कास धरणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

स्मार्ट इंडिया हाकेथॉन

उद्या, ७ वे स्मार्ट इंडिया हॅकाथॉन देशभरातील **51** केंद्रांवर एकाच वेळी सुरू होईल. नागपूरच्या सीआरपीएफ कॅम्प रोड हिंगणा स्थित जी.एच रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचाही यात समावेश आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते उद्या दूरदृश्यप्रणाली द्वारे या कार्यक्रमाचं उद्घाटन होणार आहे. दैनंदिन व्यवहारातील गंभीर समस्यांचं निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मंच उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये संशोधन आणि समस्या सोडवण्याची संस्कृती विकसित करणे हा या उपक्रमाचा उद्देश्य आहे. ३६ तास चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये सॉफ्टवेअर विकसित करणाऱ्या विद्यार्थ्यांचे संघ केंद्रीय सूक्ष्म लघु आणि मध्यम मंत्रालयाद्वारे दिलेल्या समस्यांवर उपाय शोधणार आहेत. उद्या सकाळी ८ वाजता रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालय इथं डॉ. रिझवान अहमद आणि शिव सोनी या तज्ज्ञांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचं उदघाटन होणार आहे. यात महाविद्यालयाच्या सहभागाविषयी अधिक माहिती देत आहेत डॉ संतोष जाजू -

*जी एच रायसोनी कॉलेज जोकि इंजीनियरिंग कॉलेज है, ये सातवा एडिशन सॉफ्टवेअर का रखा हुआ है, इसको हम होस्ट कर रहे है. इसमे बीस टीम आ रही है, विभिन्न स्थानो से, पूरे भारत से 140 विद्यार्थी इसमें उनके मेंटर के साथ यहां पर चार प्रॉब्लम स्टेटमेंट पर काम करने वाले है. एक तो प्रॉब्लेम स्टेटमेंट*

*स्टुडंट इनोव्हेशन सेंटर  के द्वारा दिया गया है और तीन प्रॉब्लेम स्टेटमेंट मिनिस्ट्री ऑफ स्किल डेव्हलपमेंट इससे आया हुआं हैं.*

उद्याच्या कार्यक्रमासाठी देशभरातून विद्यार्थ्यांचे चमु नागपुरात दाखल झाले आहेत. त्यापैकी चेन्नईच्या हरिणी या विद्यार्थिनीने आकाशवाणीशी संवाद साधला -

*मेरा नाम हरिणी है। हम सायराम इंजीनियरिंग कॉलेज चेन्नई से आए हैं। जी एच रायसोनी कॉलेज ऑफ़ इंजीनियरिंग में स्मार्ट इंडिया हॅकाथॉनके लिए आए हैं। पिछली बार भी हम पार्टिसिपेट किए थे और हमें बहुत एक्साइटमेंट है कल के लिये. हमारे टीम मे छे  लोग है और हम सब ने बहुत जबरदस्त तैयारी की है । हमारी जो इव्हेंट है वो सॉफ्टवेअर की है उसके लिए हमने बहुत सारे टेक्नॉलॉजी को एक्सप्लोर किया है और हमे आशा आहे की हम कल जरूर जीतेंगे.*

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

मागील वर्षी पार पडलेल्या ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या यशामुळे आत्मविश्वास वाढला असून, यावर्षी अकोला, बुलढाणा, यवतमाळसह विदर्भातील उद्योजक आणि नवीन सेक्टरचा सहभाग वाढवावा आणि विदर्भाच्या शाश्वत विकासाचे उद्दीष्ट पूर्ण करावे, असं आवाहन केंद्रीय मंत्री आणि  खासदार औद्योगिक महोत्सवाचे संयोजक नितीन गडकरी यांनी केलं. असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडी) च्या पहिल्या  वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते.  यावेळी मागील वर्षीच्या ॲडव्हांटेज विदर्भच्या अहवालाचं विमोचन करण्यात आलं. विदर्भातील सर्व औद्योगिक संघटना आणि उद्योजक एकाच मंचावर आले तर विचारांची आदान-प्रदान वाढेल, नवनवीन कल्पना विकासीत होतील. त्यातून उद्योग वाढेल, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि  विदर्भातील गरीबी दूर होईल, असा विश्वास नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

बांगलादेश हिंदू मोर्चा

बांगला देशात हिंदुवर तसेच मंदिरांवर होणाऱ्या कथित हल्ल्याच्या निषेधार्थ सकल हिंदु समाजाच्या वतीनं आज राज्यभर विविध ठिकाणी मोर्चा काढण्यात आला. अकोल्यातही हिंदू संघटनांच्या वतीने आज 'जन आक्रोश' मोर्चाचे आयोजन करण्यात आलं होत. बांगलादेश इथल्या हिंदूचं रक्षण करण्यात याव आणि त्यांच्यावर होणारे अत्याचार थांबविण्यात यावे यासाठी  ही सभा घेण्यात आली. बांगलादेशातील हिंदू लोकांवरील हल्ले थांबविण्यात यावे तसेच इस्कॉनचे संत चिन्मय दास याना तुरुगांतून सोडण्यात यावं या मागणीसाठी  गोंदियात देखील आज जन आक्रोश रॅलीचे आयोजन करण्यात आलं असून या रॅलीत हजारो हिंदू बांधवानी सहभाग

घेतला होता. त्याचप्रमाणे सकल हिंदू समाज, नागपूर यांच्या वतीने देखील व्हेरायटी चौकात भव्य मोर्चा आणि जाहिर सभा आयोजित करण्यात आली होती. तसंच गडचिरोलीतही रॅली काढण्यात आली होती.

हवामान

विदर्भात थंडी पुन्हा परतली असून गेल्या **24** तासात अकोला जिल्ह्यात सर्वात कमी किमान तापमान **11.8**अंश सेलसियस इतकं नोंदविण्यात आलं. तर नागपूरला पारा **12**अंशावर आला आहे. वाशीम वगळता अन्य जिल्ह्यामध्ये देखील तापमान **13**अंश सेलसियस पर्यंत आहे. वाशीम मध्ये किमान तापमान **19**अंशावर आहे. आगामी काही दिवस हवामानात विशेष बदल होणार नसल्याचा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाचा अंदाज आहे. दरम्यान मागील **24** तासांत कमाल तापमान वाशिम इथ 32 पूर्णांक 6 एवढं नोंदविण्यात आल आहे.

******